# ॥ श्री अन्नपूर्णास्तोत्रम् ॥

नित्यानन्दकरी वराभयकरी सौन्दर्यरत्नाकरी
निर्धूताखिलघोरपावनकरी प्रत्यक्षमाहेश्वरी
प्रालेयाचलवंशपावनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥१॥

नित्यानन्दकरी –
केवळ आनंदकरी (काही वेळापुरता) नाही तर ही देवी अन्नपूर्णा नित्य शाश्वत आनंद देणारी आहे. सामान्यतः काही काळ टिकणारा आनंद हा विषयसुखापासून मिळणारा असतो. ती वस्तू, व्यक्ती, पदार्थ नाहीसा झाला की आनंदही संपतो. Objective। परंतु चराचरात सदैव भरून राहिलेला आनंद ब्रह्माच्या सच्चिदानंद स्वरूपातील आनंद असतो. अन्नपूर्णा आपल्या भक्ताला नित्यानंदाशी समरसता साधून देते.

वराभयकरी – वरदान आणि अभय देणारी आहे. भय माणसाची शेवटपर्यंत सोडत नाही. कशाचे ना कशाचे भय असतेच. भय कधी संपत नाही. भोगे रोगभयं ------! मात्र अन्नपूर्णा वर देतानाच अभयही देते. जेव्हा जेव्हा माणसाला भय वाटेल तेव्हा तेव्हा अन्नपूर्णेच्या अभयहस्ताचे नुसते स्मरण जरी केले तरी भीती नाहीशी होते. आणि हे सर्व करत असताना ती शस्त्रास्त्रांनी सज्ज अशी महिषासुरमर्दिनी नाही तर सौंदर्यरत्नाकरी आहे. सौंदर्याची जणू खाणच आहे. जीवनात सौंदर्य म्हणजे काय याचे जिवंत उदाहरण आहे. सत्यं शिवं सुंदरम्। अशी चढत्या क्रमाने जाणारी सात्त्विकता निच्यात आहे. व्यक्तित मनात भरून राहिलेली सात्त्विकता जेव्हा मुखकमलावर प्रकट होते तेव्हा त्या व्यक्तीच्या शरीरसौंदर्याकडे लक्षच जात नाही. सात्त्विकतेपुढे कोणतीच मलीनता राहू शकत नाही. आणि म्हणूनच आचार्य शंकर वर्णन...

| MARCH '14 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| M | T | W | T | F | S | S |

©www.madhaveeradhuveer.com

जपाकुसुमसंकाशौ मदघूर्णितलोचनौ ।
जगतः पितरौ वन्दे भैरवीभैरवात्मकौ ।।



निर्धूताखिलघोरपावनकरी - शरण आलेल्यांकडून पूर्वी घडलेल्या सर्व घोर पापांना निपटून टाकणारी! निर्धूत - निश्चयाने धुवून टाकणारी। पाप म्हणजे संकट असा अर्थ घेतला तर घोर संकटाचे निवारण करणारी। किंवा ~~कि~~ पाप म्हणजे ~~कलंक~~ - सदोष आचरणामुळे चारित्र्याला लागलेला डाग। असा डाग जर राहिला तर नित्यानंद प्राप्त होऊ शकणार नाही. परंतु देवी माता असा आचरणातील दोष पूर्णपणे धुवून टाकते.

प्रत्यक्ष माहेश्वरी - साक्षात महेश्वराची प्रिय पत्नी आहे. महेश्वर - माहेश्वरी भैरव - भैरवी। साक्षात मांगल्य पावित्र्य! ही दक्षकन्या नव्हे तर प्रचंड तपश्चर्या करून शिवाला प्रसन्न करून त्याच्या अर्धांगिनीपदाचा मान मिळवणारी ही हिमगौरी आहे माहेश्वरी आहे.

प्रालेयाचलवंशपावनकरी - आपला पिता जो हिमालय, त्याच्या पूर्ण वंशाला पावन करणारी नावलौकिक मिळवून देणारी आहे. त्यामुळेच हिमालयाला देवतात्मा म्हणतात.

काशीपुराधीश्वरी - काशी नगरीची सम्राज्ञी। हा केवळ काशीक्षेत्राचा उल्लेख नाही. तर काशी म्हणजे प्रकाशिका। तमाचा - अज्ञानाचा नाश करून सर्वत्र ज्ञानाचा प्रकाश पसरवणारी. ज्ञानदायिनी, मोक्षदायिनी अशा काशीनगरीवर जिचा अधिकार चालतो. प्रत्येक श्लोकातील तिसऱ्या ओळीत दुसऱ्या चरणात 'काशीपुराधीश्वरी' हा उल्लेख आहेच.

काश्यते हि काशते काशी । काशिसर्वप्रकाशिका ।
सा काशी विदिता येन । तेन प्राप्ता हि काशिका ।।

या श्लोकातील प्रत्येक शब्द आपल्यावर अमृताचा शिडकावा करतो व आपण यात गुंगून जातो.

आपण पुढे केलेल्या भिक्षापात्रात भरभरून इष्ट ती भिक्षा घालणाऱ्या अन्नपूर्णेची सगुणापासून निर्गुणापर्यंत नेणारी निरनिराळी रूपे आचार्य यात वर्णन करतात.

JANUARY '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

© www.madhaveeraghuveer.com

नानारत्नविचित्रभूषणकरी हेमाम्बराडम्बरी
मुक्ताहारविलम्बमानविलसद्वक्षोजकुम्भान्तरी ।
काश्मीरागरुवासिताङ्गरुचिरे काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥

स्वतःच्या मूळच्या सात्त्विक सौंदर्याने भोवतालच्या वातावरणातही सात्त्विकता उत्पन्न करणारी, तिचे वर्णन पहिल्या श्लोकातील 'सौंदर्यरत्नाकरी' या शब्दातून केले आहे, तिचेच सगुण साकार वर्णन यात आहे.

नानारत्नविचित्रभूषणकरी – विविध रत्नांना अतिशय आकर्षक अशा अलंकाराच्या रूपात धारण करणारी अशी आहे. खरं पाहता या अलंकारामुळे तिचे रूप खुलते की तिच्यामुळे या रत्नांना शोभा येते?

तसे पाहिले तर अलंकार/रत्ने सराफकट्ट्यांवरील काचेच्या कपाटांमध्ये सुद्धा शोभून दिसतात. त्यांची झळाळी उठून दिसते. परंतु तिथे त्यांचा रजोगुण हा प्राधान्याने दिसून येतो. त्याविषयी लोभ-आकर्षण निर्माण करतो. परंतु हेच अलंकार जेव्हा देवीच्या अंगावर घातले जातात, तेव्हा त्यांची झळाळी वेगळीच भासते कारण त्यात सत्त्वगुणाचे सौंदर्य असते ते प्रसन्नता, आनंद, समाधान देणारे असते. भक्ताच्या समर्पणभावामुळे ते आधिक्य उजळून निघते. कारण त्या अलंकाराचे बाजारातील मूल्य भक्तिभावापुढे फिके पडते. लहान बाळाला दागिन्यांशी काही देणे-घेणे नसते पण त्याला नटवण्यात आईला मात्र परमानंद वाटतो तसेच अन्नपूर्णेला या अलंकारांविषयी विशेष प्रेम नसले तरी ते अर्पण करणाऱ्या भक्ताचा खरा भाव तिला प्रिय असतो. त्याच्या आनंदासाठी ती ते धारण करते. तिला विजेच्या माळांपेक्षा समईच्या ज्योतीच प्रिय असतात.

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeraghuveer.com

हेमाम्बराडम्बरी - अलंकार, भूषणे यांचे वर्णन झाल्यावर आचार्य तिच्या वस्त्रप्रावरणांचे वर्णन करतात. तिच्या अंगावरील वस्त्र सोन्याचेच आहे. नुसते जरतारी नाही तर जरीचेच आहे. सोन्याच्या अलंकारांच्या सात्त्विकतेच्या झळाळीला या सुवर्णवस्त्राने सौंदर्याची शोभाही प्राप्त झाली आहे. त्यामुळे अन्नपूर्णेवरची दृष्टी हलतच नाही. मुखावलोकन झाल्यावर असा दृष्टी वक्षभागाकडे वळते.

मुक्ताहारविलम्बमानविलसद्वक्षोजकुम्भान्तरी -
उठावदार वक्षप्रदेशावर मौक्तिकमाला शोभून दिसत आहे. मोत्यांची शोभा त्यांच्या पाणीदारपणावर, त्यांच्या किंचित गुलाबी छटेवर आणि त्यांच्या टपोरपणावर अवलंबून असते. रत्ने, सोने, मोती ही ऐहिकातील वैभवाचे प्रदर्शन करणारी साधने असली तरी ती अन्नपूर्णेच्या अंगावर ती प्रसन्नता व पारमार्थिक आनंद देणारी ठरतात.

काश्मीरागरुवासिनी - अन्नपूर्णेला शरण जाणारा भक्तही तसा तिच्या मूर्तीपासून दूरच असतो. त्यामुळे केवळ रूप व गंध यांचाच आस्वाद घेऊ शकतो. तिने अंगाला केशर, अगरु, चंदन यांची उटी लावली आहे. त्यामुळे ती सुगंधी झाली आहे.

आडम्बरी तिच्या सिंहासनाच्या प्रभावळीवर (महिरप, कमान) सुवर्ण वस्त्र शोभून दिसत आहे.

स्त्री - सुगंधाचे आकर्षण - मोगरीचा गजरा
परिमळ
स्वयंपाकघरातील वास

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |
| S | M | T | W | T | F | S | |

JANUARY '14

योगानन्दकरी रिपुक्षयकरी धर्मैकनिष्ठाकरी
चन्द्रार्कानलभासमानलहरी त्रैलोक्यरक्षाकरी
सर्वैश्वर्यकरी तपःफलकरी काशीपुराधीश्वरी।
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥३॥

अन्नपूर्णा ही योगाचा आनंद देणारी आहे. समाधिचा आनंद साधकांना मिळवून देते तशीच सामान्य साधकांना देखील योगानंद देते. योगक्षेमं वहाम्यहम्। योग म्हणजे अप्राप्य ते प्राप्त होणे आणि क्षेम म्हणजे मिळालेले राखून ठेवणे. इथे अप्राप्य काय आहे? आनंद मिळवण्यासाठी मनोजय साधावा लागतो. आणि प्रपंचात मन ताब्यात ठेवणे हे कठीण-अप्राप्यच वाटते. परंतु अन्नपूर्णेच्या कृपेने तेही शक्य होते. चंडमुंड-

रिपुक्षयकरी - इथे बाह्य शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रूचा नाश करणारी हा अर्थ योग्य ठरतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांचा बीमोड करणारी ती आहे. सर्व दुःखांचे अस्वस्थतेचे मूळ काम आहे. कामना पूर्ण झाली तर मद होतो आणि पूर्ण झाली नाही तर क्रोध येतो. माता अन्नपूर्णा मात्र मुळावरच घाव घालते.

धर्मैकनिष्ठाकरी - वेदान्ताच्या दृष्टीने प्रवृत्ति आणि निवृत्ति हेच प्रमुख धर्म आहेत. षड्रिपुंचा नाश करणारी अन्नपूर्णा वृत्तींची निवृत्ती करून केवळ एका परब्रह्मावर निष्ठा ठेवायला सहाय्यभूत होते. सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज हा भगवंताचा संदेश हेच सांगतो. या आदेशाचे पालन करण्यासाठी ती धर्मैकनिष्ठाकरी होते.

चन्द्रार्कानलभासमानलहरी - चंद्र सूर्य व अग्नि ही तीन प्रमुख तेज तत्त्वे आहेत. त्यांच्या प्रकाशलहरींप्रमाणे अन्नपूर्णेचे तेज आहे. सूर्य हा प्रखर तेजस्वी आहे तो दाहक आहे. चंद्र हा शीतल व औषधी गुणधर्मांनी युक्त आहे अग्नि हा तर पावक, शुद्ध, सोवळा आहे.

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

त्रैलोक्यरक्षाकरी – स्वर्ग, पृथ्वी, पाताळ या तिन्ही लोकांचे सर्व बाजूंनी रक्षण करणारी आहे.
सर्वैश्वर्यसमस्तवांछितकरी – सर्व प्रकारचे ऐश्वर्य तूच देतेस. बाह्य ऐश्वर्याबरोबरच आंतरिक वैभव देतेस. तपश्चर्येचे फळ देणारी तू आहेस आणि तप पूर्णत्वाला नेणारी आहेस.

या ३ ऱ्या श्लोकात व स्वतंत्रता गीतातील साम्यस्थळे

क्रां सावरकर

योगानन्दकरी – स्वतंत्रते भगवती योगीजन परब्रह्म वदती।
रिपुक्षयकरी – हे अधम रक्त रंजिते
सर्वैश्वर्यकरी – जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते।
चन्द्रार्कानलभासमानलहरी – तू सूर्याचे तेज उदधिचे गांभीर्यही
तपःफलकरी – शिवास्पदे शुभदे

कैलासाचल कन्दरालयकरी गौरी ह्युमा शंकरी
कौमारी निगमार्थगोचरकरी ओंकारबीजाक्षरी।
मोक्षद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥४॥

कैलास पर्वताच्या गुहेत गौरीरुपाने तू शंकराच्या प्राप्तीसाठी कठोर तपश्चर्या केलीस. तेव्हा तुझ्या मातेला कळवळा येऊन ती तुला सतत – उ (अग मुली) मा (नको करूस असे) (खडतर तप) असे सांगत राहिल्याने तुला 'उमा' नाव प्राप्त झाले. अखेरीस तू शंकरांना प्राप्त करून घेतलेसच. म्हणून तुझे नाव शंकरी आहे आणि तू कार्तिकेयाची (कुमाराची) माता ∴ कुमारी
तुझ्या प्रत्येक नावामागे तुझा महिमा लपलेला आहे, पण त्याहूनही तुझे प्रचंड सामर्थ्य म्हणजे तू निगमार्थगोचरी आहेस. तुझ्या भक्तांच्या बुद्धीत तू वेदांचा अर्थ प्रगट करतेस आणि तुझ्या कृपेने ओंकार

JANUARY '14

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

© www.madhaveeraghuveer.com

म्हणजेच 'प्रणव बीज' सहज साध्य होते. म्हणूनच तुला ओंकारबीजाक्षरी असे म्हटले आहे. साधना करणाऱ्या तुझ्या भक्तांसाठी मोक्षमंदिराची दारं तू सताड उघडी करून देतेस. म्हणजे कोणतेही विघ्न नयेता ते सरळ मोक्षाला पोहोचतात. मोक्षद्वारकपाटपाटनकरी

दृश्यादृश्यविभूतिवाहनकरी ब्रह्मांडभाण्डोदरी।
लीलानाटकसूत्रखेलनकरी विज्ञानदीपाङ्कुरी।
श्री विश्वेशमनःप्रसादनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥५॥

दृश्य आणि अदृश्य, व्यक्त आणि अव्यक्त अशा ज्या ज्या विभूति या सृष्टीमध्ये आहेत, त्यांना धारण करणारी तूच आहेस. हे संपूर्ण ब्रह्मांड तुझ्याच उदरात आहे. ही सर्व तुझीच लीला आहे. या नटनाट्य खेळाचे सूत्र तुझ्याच हातात आहे. तूच ते सूत्र हलवून खेळ करत असते.
भ्रामयन् सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।
हे सर्व करत असताना भक्तांच्या बुद्धीत विज्ञानाचा दीप उजळवणारी तूच आहेस. आणि त्याच वेळेस तू विश्वेशाचे मन प्रसन्न राखण्याचे ही काम करत असतेस. थोडक्यात, हा सर्व मायेचा खेळ आहे. ही त्या शक्तीदेवतेची माया आहे.
या श्लोकात लीला, क्रीडा, नाटक या शब्दातून काय अभिप्रेत आहे ते पाहूया.
लीला ही अगाध असते. क्रीडा ही निरंतर असते संपतच नाही तर नाटक हा भास असतो. भगवंत आणि भगवंत सोध्यान-घडणारे लीलाप्रसंग कोणते? त्याची क्रीडा कोणती? आणि या

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MARCH '14 | 31 | | | | | 1 | 2 |
| | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| | M | T | W | T | F | S | S |

जन्म कर्म च मे दिव्यं

© www.madhaveeraghuveer.com

वत्सल माता, आज्ञाधारक सून, प्रेमळ पत्नी, शत्रुसाठी रणरागिणी
[illegible] देवासी मैत्रिण, कार्यकुशल
गृहिणी, सचिव, रंभा, सुगरण.

संसाररूपी नाट्यात त्यांचे कार्य (सूत्रधार) कोणते
या तीनही बाबतीत सूत्रधार नेहमी अव्यक्तच
असतो. तो स्वत: समोर येत नाही परंतु कुणाला
कोणत्या वेळी पडद्यासमोर आणायचे, कुणाला
पडद्यामागे ठेवायचे हे सारे तोच ठरवतो. त्याच्या
योजनांचा थांग पत्ता सर्वसामान्यांना लागत नाही.
त्याच्या योजना गुप्त असतात. 'अघटित घटना
घटीयसी माया' एवढेच आपण म्हणू शकतो.
त्याचे कार्य योजनाबद्ध असले तरी सर्वसामान्य
मनुष्याला ते अतार्किक, चमत्कारिक वाटू शकते.
म. व्यास विमनस्क अवस्थेत असताना नारदमुनींनी
त्यांना भगवंताच्या लीला सांगण्यास सांगितले.
मूलत: भागवत केवळ चार श्लोकांचे आहे परंतु
त्याचा विस्तार १८,००० श्लोकांमध्ये केला आहे.
त्याचप्रमाणे विश्वेशाला प्रसन्न करण्यासाठी
त्यानेच दिलेल्या मूळ सूत्राच्या आधारे आदिमायेने
त्याला प्रसन्न करील असा खेळ मांडला.
शिव शक्ती सामरस्य हा ब्रह्म मायेचा प्रपंच आहे.
एकलेते एक ब्रह्म मायेमुळे विविध दिसू लागले.
ब्रह्म हे मूलत: अद्वैत असून द्वैत हे त्याने
घेतलेले सोंग आहे. मूळ ब्रह्म - शिव - परमात्मा
शक्ती आत्मा एकच एक आहे. माया त्याला
लपवते आणि आपला खेळ सुरू करते. ती
द्वैताची आकर्षक मांडणी करते. ईश्वराची माया
म्हणून तिला स्वतंत्र अस्तित्व नाही. परमात्मा
जोवर तिला मोकळीक सोडतो तोवर तिचा खेळ
ती मांडते. पण तिला आवरून घेण्याचे
सामर्थ्यही त्याच्यात आहे. या पाच
लोकात आदिमायेचे रूप विविधतेने
नटलेले आहे. तीच गौरी, तीच अन्नपूर्णा
तीच लक्ष्मी, तीच सरस्वती, तीच दुर्गा आहे.

JANUARY '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

शम्भुप्रिया शांकरी
आदिक्षान्तसमस्तवर्णनिकरी शम्भोस्त्रिभावाकरी
काश्मीरत्रिजनेश्वरी त्रिलहरी नित्यांकुरा शर्वरी।
स्वर्गद्वारकपाटपाटनकरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥
॥६॥

अ पासून क्ष पर्यंत सर्व वर्णांना स्पष्ट करणारी, शंभुला प्रिय असणारी, संपूर्ण जिला शंकरमय झालेली शांकरी, तेजोमय केशरी वर्णाच्या त्रिपुरांवर (म्हणजेच तीन देहांवर) सत्ता गाजवणारी त्रिनयनी (कुंडलिनी) आहेस. -(साडेतीन वेटोळे घालून कुंकुम स्नानात न्हाऊन शांत निजणारी) विश्वेश्वरी म्हणजे शंकराची अर्धांगिनी आहेस. आणि शर्वरी म्हणजे कालरात्रि देवी आहे. ती जशी मोक्षाची दारे उघडून देते तशीच स्वर्गद्वार ही खुले करून देते.

ही आदिमाया अन्नपूर्णा सृष्टीतील सर्व कार्याच्या मुळाशी तीच आहे. वर्णमालेचे अधिष्ठान तीच आहे. सर्व देहांवर (स्थूल, सूक्ष्म, कारण) सत्ता चालवणारी कुंडलिनी शक्ती तीच आहे. सामान्यपणे माणसाला पुण्यकर्म करून स्वर्ग प्राप्त करण्याची इच्छा असते. तीही कामना ती पूर्ण करते. असे तिचे कार्यकर्तृत्व असल्याने तिला त्रिपुरेश्वरी किंवा ललिता म्हटले जाते.

उर्वी सर्वजनेश्वरी जयकरी माता कृपासागरी
वेणीनीलसमानकुन्तलधरी नित्यान्नदानेश्वरी।
सर्वानन्दकरी दशाशुभहरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी
॥७॥

| MARCH '14 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| M | T | W | T | F | S | S |

या श्लोकात अन्नपूर्णा सगुण साकार होते. यात तिचे धरित्री रूपातील वर्णन आहे.

© www.madhaveeraghuveer.com

आजपर्यंत तिच्या सौंदर्याचे, व्यापकत्वाचे वर्णन आले होते. आता मात्र तिचे अन्नदात्री हे रूप वर्णन केले आहे. उर्वी म्हणजे पृथ्वी किंवा सर्वश्रेष्ठ स्त्री असे म्हटले आहे. ती सर्व विश्वाची स्वामिनी आहे [पृथ्वी, भूमा धारणी, अवनी, धरा, क्षमा]

तू जय देणारी आहेस कृपेच्या सागर तू आहेस. कोवळ्याभोर कुसांची वेणी तू धारण केली आहेस या उल्लेखामुळे थोडा विचारांचा गोंधळ उडू शकतो. परंतु पुढच्या शब्द वापरला की कल्पना स्पष्ट होते. हे काळे केस म्हणजे सुपीक जमीन आहे. ही जमीन कधीही नकार देत नाही. नित्य अन्नाचा पुरवठा करत असते. हे निसर्गाचे शक्तिरूप, मातृरूप कविमनाला सतत आवाहन करत असते. मातेचे स्तन्य जसे वात्सल्यामुळे अधिकच पुष्ट करत असते तसेच ही धरित्री तिच्या बाळांना भरभरून देतच असते.

बहिणाबाई - धरित्रीच्या कुशीमध्ये
बीयं बियाणं निजली।
वर पसरली माती
जशी शाल पांघरली।

ह्याच बहिणाबाई पुढे म्हणतात-

धरतीमधल्या रसानं - जीभ माझी सवादली
तेव्हा तोंडातली चव - पिंडामध्ये ठाव घेते

असे हे अन्नपूर्णेचे महात्म्य फार मोठे आहे आणि म्हणूनच नवीन संसाराला सुरुवात करताना, गृहस्थाश्रम स्वीकारताना पती-पत्नी आदराने आपल्या घरातील देवघरात अन्नपूर्णेला आदराचे स्थान देतात आणि मातृभावाने तिला साद घालतात.

© www.madhaveeraghuveer.com

देवी सर्वविचित्ररत्नरुचिरा दाक्षायणी सुंदरी
वामा स्वादुपयोधरी प्रियकरी सौभाग्यमाहेश्वरी
भक्ताभीष्टकरी दशाशुभहरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥
॥ ८ ॥

देवी हे देवी संबोधन आहे. द्यु म्हणजे तेज. अन्नपूर्णेचे दिव्य तेजस्वी रूप स्पष्ट केले आहे. सर्व प्रकारच्या वैविध्यपूर्ण रत्नांनी तुझे रूप अत्यंत खुलून दिसते आहे. तू दक्षाची सुंदर कन्या आहेस. तुझ्या सौंदर्यामुळे तुला 'वामा' हे नाव शोभून दिसते. मधुर दुधाने भरलेल्या स्तनांमुळे तुझी वत्सलता दिसून येते व तिचे सौंदर्य उजळून निघते. तू सर्वांचे प्रिय करणारी सर्वांना सौभाग्य देणारी माहेश्वरी आहेस महेश्वराची प्रिय पत्नी आहेस. तू भक्तांना अभीष्ट देणारी, त्यांचे कल्याण करणारी, दहा प्रकारच्या पापांपासून त्यांची सुटका करणारी अशी आहेस. चोरी, हिंसा, व्यभिचार, कठोर बोलणे, खोटे बोलणे, चहाडी, असंबद्ध बोलणे, मत्सर, गैरसमज

या श्लोकातून तिचे सौंदर्य, समृद्धी, संपन्न माहेर आणि सामर्थ्य संपन्न पती, असे गृहलक्ष्मीचे रूप खुलून दिसते. गृहस्थाश्रम हा गृहिणीवर अवलंबून असतो

गृहिणी गृहमुच्यते।

स्त्री ही पुरुषाची अर्धांगिनी आहे. यात श्रेष्ठ कनिष्ठ कोणीही नाही.

मनुस्मृतिचा अभ्यास न करता काही काळ तथाकथित विद्वान मनुला स्त्री द्वेष्टा मानतात. स्त्रियांना कमी लेखणे जसे चूक तसेच अवाजवी स्वातंत्र्याचा पुरस्कारही चूकच आहे.

© www.madhaveeraghuveer.com

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

मनुने गृहिणीचे घरातील स्थान अत्यंत सार्थक शब्दात वर्णन केले आहे.

प्रजननार्थं महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन॥

पूजनीय आदरणीय साक्षात गृहिणी हीच घरातील लक्ष्मी होय हे तिचे रूप त्या कार्यातून, गुणांतून व्यक्त होते. मनुच्या वर्णनात जी गुण वैशिष्ट्य आली आहेत. तसेच शंकराचार्यांच्या स्तोत्रामधून ठळकपणे ~~व्यक्त~~ व्यक्त होतात. प्रियकरी - ज्याला जे प्रिय ते करणारी, माहेश्वरी - पतीशी समरस होणारी, अभीष्टकरी - इष्ट तेच करणारी, दशाशुभहरी - जे अमंगल, अशुभ, अहित करणारे आहे त्याचा बीमोड करणारी. गृहलक्ष्मी आहे.

या अन्नपूर्णेचे रूप केवळ लक्ष्मीचे नसून ती सरस्वती सुद्धा आहे.

चन्द्रार्कानलकोटिकोटिसदृशी चन्द्रांशुबिम्बाधरी
चन्द्रार्काग्निसमानकुण्डलधरी चन्द्रार्कवर्णेश्वरी
मालापुस्तकपाशसाङ्कुशधरी काशीपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ॥१२॥

या श्लोकातील तिसऱ्या ओळीतून माला, पुस्तक, पाश आणि अंकुश धारण करणारी अशी शारदा स्वरूप माता तूच आहेस असे वर्णन येते.

या स्तोत्रातील पहिल्याच श्लोकात वर व अभय मुद्रेचा उल्लेख आला होता. त्याचाच विस्तार या ओळीतून आला आहे. माला म्हणजे वर्णमाला - अक्षर ओळख. पुस्तकरूपाने विद्या म्हणजे शास्त्र व कला. पाश म्हणजे नियमबद्धता आणि अंकुश म्हणजे सद्सद् विवेक बुद्धीची टोचणी.

JANUARY '14

| M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

© www.madhaveeraghuveer.com

[तीव्र वैराग्य पायाशी : व्यायाम आणि चालणे
प्रगाढ - | अभ्यास - वैराग्य. | शैली - तेण काढणे
की - पेरणे | Car - Acciliarator, Brake
अति नियम करू नये | नियमाविणा राहू नये.]

सरस्वतीच्या चार हातातील चार गोष्टी
ती ज्ञानी आहे तर भक्तांना मार्गदर्शन देते
त्यामुळे हिचा भक्त कोणत्याही क्षेत्रात शिरला
तरी सुसंस्कृत, विद्यासंपन्न असल्याने नवनवीन
शिखरे पार करत जातो. त्यातून त्याचे व्यक्तिमत्व
तेजाने उजळून निघते. अर्थातच सरस्वती रूपात
म्हणूनच इथे चंद्राच्या उजेडाला जागा आहे. इथे
कोर ही संख्या नसून त्यातून विविधता दर्शवली
आहे. चंद्र सूर्य आणि हे तीनही तेजस्वी असले
तरी त्यात विविधता आहे. सूर्य दाहक तर चंद्र
शीतल आहे. आणि इथे अग्नि हा समईतील
ज्योतिस्वरूप शांत, स्निग्ध रूप आहे.

सरस्वतीच्या सूर्यवर्तिक, आत्मज्योतीवरील
तेज हे विशेष, ज्ञानाचे तेज आहे. विद्या विनयेन
शोभते त्यामुळे त्याची ही तीनही रूपे
फिकी पडतात. याच तिच्या तेजामुळे अज्ञानाचा
नायनाट होतो. अर्थातच सरस्वती रूपाने
ज्ञानदायिनी म्हणून प्रगट होते.

क्रमशः ---

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeraghuveer.com

क्षत्रत्राणकरी महाभयहरी माता कृपासागरी
सर्वानन्दकरी सदाशिवकरी विश्वेश्वरी श्रीधरी।
दक्षाक्रन्दकरी निरामयकरी काशिपुराधीश्वरी
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी॥१०॥

क्षत्रिय सर्वांचे रक्षण करतात. परंतु क्षत्रियांचे रक्षण करणारी आहेस. तूच महाभयाला दूर ठेवतेस. कृपेचा सागर तूच आहेस. तू सर्वांना आनंद देणारी आहेस. सर्वांचे कल्याण करणारी आहेस. संपूर्ण विश्वात तुझीच सत्ता आहे. श्रीधरी म्हणजे ऐश्वर्य धारण करणारी तूच आहेस. दक्षाला देखील आक्रंदन करायला लावणारी आहेस. भक्तांना निरामय करणारी व्याधि-विकारमुक्त करणारी व आरोग्य प्रदान करणारी अशी तू आहेस.

क्षत्र या शब्दार्थ फार वेगळा आहे. क्षत्र म्हणजे श्रेष्ठ सामर्थ्य म्हणजेच आत्मशक्ती! त्या आत्मशक्तीचे रक्षण करणारी तूच आहेस.

महाभयहरी- महाभयंकर शत्रूचे, संकटाचे भयही दूर करणारी तूच आहेस. महाभय म्हणजे मृत्यूचे भय. मृत्यूचे भय समूळ नष्ट करणारी तूच आहेस. भय अनेकविध गोष्टींचे असते. किंबहुना प्रत्येक गोष्ट इथे भयाने वेढलेली आहे. भर्तृहरि म्हणतो.

भोगे रोगभयं कुले च्युतिभयं
वित्ते नृपालात् भयम्।
मौने दैन्यभयं बले रिपुभयं
रूपे जरायां भयम्।
शास्त्रे वादभयं गुणे खलभयं
काये कृतान्तात् भयम्।
सर्वं वस्तु भयान्वितं खलु नृणां
वैराग्यमेवाभयम्॥

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | JANUARY '14 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |
| S | M | T | W | T | F | S | |

© www.madhaveeraghuveer.com

दक्षक्रन्दकरी – वस्तुतः दक्ष हा अत्यंत तेजस्वी. साक्षात शंकराचा सासरा – सतीचा पिता. परंतु अहंकाराने उन्मत्त होऊन शंकराचा अपमान केला. पोटच्या मुलगी सतीकडे देखील दुर्लक्ष केले. या सर्वाचा परिणाम म्हणून त्याला जन्मभर आक्रंदन करावे लागले. अशी जबर शिक्षा सतीनेच यज्ञप्रसंगी दिली तेव्हा ती जे बोलली ते भागवताच्या ४ थ्या स्कंदातील ४ थ्या अध्यायात व्यासांनी सर्वांसमोर मांडले आहे.

जर बेताल मनुष्य धर्ममर्यादेने रक्षण करणाऱ्या आपल्या स्वामीची निंदा करेल आणि आपल्यात त्याला दंड करण्याची शक्ती नसेल तर सरळ कान बंद करून तिथून निघून जावे आणि शक्ती असेल तर त्याला ताकदीने पकडून त्याची बडबड बंद करावी. आणि त्याची अमंगळ जीभ छाटून टाकावी वेळप्रसंगी आपले प्राणही द्यायला मागेपुढे पाहू नये. हेच धर्म आहे. (१७)

आपण भगवान शंकरांचा अपराध करणारे आहात. म्हणून आपल्या शरीरापासून उत्पन्न झालेल्या या निंद्य देहाला ठेवून मी काय करू? आपल्या सारख्या दुर्जनाशी संबंध असल्याची मला लाज वाटते. जो महापुरुषांचा अपमान करतो, त्यापासून उत्पन्न होणाऱ्या जन्माचाही धिक्कार असो. (श्लो. २२)

ज्यावेळेस भ. शिव माझा आपल्याशी संबंध दाखवण्याच्या हेतूने मला दाक्षायणी म्हणतील तेव्हा ती थट्टा माझ्या जिव्हारी लागेल. मला ते लज्जास्पद वाटेल. व खेद होईल.

निरामयकरी – वाच्यार्थाने आरोग्यपूर्ण व्याधिरहित करणारी परंतु लक्ष्यार्थाने आत्मशक्ती जागृत ठेवणारी. अशी आहे.

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

शक्ती ऊर्जा - सामर्थ्य हे शिवाचे अर्धांग आहे. शिवात शक्ती आहे आणि शक्तीत शिवाचे अधिष्ठान आहे. म्हणूनच शक्ती संहारक आहे तशीच ती उत्पादकही आहे. ती दुर्गा आहे तशीच ती गौरीही आहे.

म्हणूनच शारीरिक व्याधींचा नाश करून ती नश्वर शरीराला निरामय बनवते. तशीच मानसिक दौर्बल्यामध्ये धी - धैर्य - आत्मज्ञान या ऊर्जेने आत्मविश्वास उत्पन्न करते. त्याची आत्मशक्ती सदैव जागृत ठेवते.

शाक्तपंथातील पंच मकारांचा त्याग करायचा आहे कारण ते तामसी वाममार्गीय आहेत.

मद्य - मदिरापान नसून | सहस्रकमलातून उत्पन्न होणाऱ्या
मांस - मांसाशन नाही | पापपुण्यरूपी पशुला मारून ब्रह्मलीन करणे. (अनुभवणे)
मत्स्य - प्राण व अपान वायुला सुषुम्नेमध्ये संचलित करणे
मुद्रा - असत्संगाचा त्याग व सत्संगाचा स्वीकार
मैथुन - शिवशक्तीतील सामरस्य.

सारांश तामस पंच मकारांचा त्याग करून सात्त्विक पंच मकारांचा अवलंब प्रसन्नात्मा होऊ शकतात. असे स्वास्थ्य निश्चित प्राप्त करता येईल.
मैथुन म्हणजे सहस्रदलकमलातील शिवाचे कुंडलिनी शक्तीशी मीलन होणे.

या १० श्लोकात हे स्तोत्र संपल्यासारखे वाटते. परंतु पुढील २ श्लोक अधिकच महत्त्वाचे आहेत. अन्नपूर्णेकडून मिळालेल्या ज्ञान - वैराग्याच्या भिक्षेवर साऱ्या सृष्टीला सुखी, समाधानी बनवायचे आहे (लोकाःसकल)

अन्नपूर्णे सदापूर्णे शंकरप्राणवल्लभे
ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वति ॥११॥
माता च पार्वती देवी पिता देवो महेश्वरः
बान्धवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम् ॥१२॥

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

JANUARY '14

अहो शेवटचे दोन श्लोक म्हणजे मागील दहा श्लोकांवरील कळस आहे Cherry on the cake

प्रत्येकाने आपापल्या साधने प्रमाणे अनुपूर्ण करून मिळालेल्या ज्ञान वैराग्याच्या शिदोरीच्या जोरावर स्वतःला व पर्यायाने सर्व सृष्टीला सुखी समाधानी बनवायचे आहे. ज्याला शिव शक्तीचे सामरस्य समजले त्याच्यासाठी हे सर्व विश्वाचे माझे घर अशी भावना उमलून येईल.

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्॥

9 10 11 12 1 2 3 4 5 6

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeraghuveer.com